# 'समांतर'चे आज सादरीकरण

संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी)- समांतर जलवाहिनीचे ३० डिसेंबर रोजी शहरातील नागरिकांसाठी सादरीकरण करण्यात येणार आहे. संत एकनाथ रंगमंदिरात सकाळी १० ते १२ व संत तुकोबाराय नाट्यगृह सिडको येथे दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत हे सादरीकरण होणार आहे.

केंद्र शासनाच्या अर्थसाहाय्याने समांतर जलवाहिनी टाकण्यात येत आहे. १ जानेवारी २०१३ रोजी मनपाची पाणीपुरवठा योजना समांतरच्या कंत्राटदाराकडे वर्ग करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या मनातील शंकांचे निरसन करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाच्या वतीने समांतरचे सादरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. समांतर जलवाहिनीची माहिती, कामाचे नियोजन, नागरिकांना द्यायच्या सोयीसुविधा या विषयी या वेळी माहिती देण्यात येणार आहे. नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सखाराम पानझडे यांनी केले आहे.